




Title Code- MAHMAR-51647

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com








वर्ष ३ रे | अंक : ७३४ . वा | बुधवार | दि. १० एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये


# बुलडाणा,देऊळगाव राजा,चिखली येथे महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या प्रचार कार्यालयाचे भगवमय वातावरणात उद्घाटन...



महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करतांना बुलडाणा अर्बन सर्वेसर्वा राधेश्याम चांडक,खा.प्रतापराव जाधव आ.संजुभाऊ गायकवाड,सह महायुतीचे सर्व मान्यवर पदाधिकारी



महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी आ.श्वेताताई महाले,खा.प्रतापराव जाधव सह महायुतीचे मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती



महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी माजी केबिनेट मंत्री आ.राजेंद्र शिंगणे,माजी आ.खेडेकर सह भाजपाचे मान्यवर पदाधिकारी यांची उपस्थिती



महायुतीचे लोकसभा उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करतांना महायुतीचे मान्यवर पदाधिकारी तसेच कार्यकर्ते उपस्थितीत

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्यातील मुख्यालयी येथे बुलडाणा तसेच देऊळगाव राजा,चिखली लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार भूमिपुत्र खासदार मा.प्रतापराव जाधव यांच्या प्रचार कार्यालयाचे उदघाटन बुलडाणा अर्बन सर्वेसर्वा राधेश्याम चांडक मा.प्रतापराव जाधव यांच्या यांच्या हस्ते व लोकसभा संपर्क प्रमुख विजयराज शिंदे,आमदार संजुभाऊ गायकवाड,योगेंद्र गोडे,ओमसिंग राजपूत यांच्यासह भाजपा व शिंदे गट शिवसेनाचे मान्यवर यांच्या उपस्थित संपन्न झाले. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांचा अबकी बार ४०० पार हा नारा यशस्वी करण्यासाठी व विकसित भारताच्या यात्रेत सहभागी होण्यासाठी सज्ज असणाऱ्या महायुतीच्या निवडणूक प्रचार कार्यालयाचे थाटात उद्घाटन संपन्न. विकसित भारताचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी वाटचाल करणारे देशाचे यशस्वी पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांना पुन्हा पंतप्रधान बनविण्याचा निर्धार करत बुलडाणा लोकसभेवर पुन्हा महायुतीचा भगवा झेंडा फडकवण्याचा संकल्प यावेळी महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी व्यक्त केला. याप्रसंगी उद्घाटक बुलडाणा अर्बन संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक व आमदार संजू भाऊ गायकवाड,माजी आमदार तथा भाजपा नेते विजयराज शिंदे,योगेंद्र गोडे सह महायुती चे प्रमुख पदाधिकारी व तसेच महायुती मधील घटक पक्षाचे सर्व मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. हिंदु नववर्ष म्हणजे गुढीपाडवा या शुभ दिनी आपणास वा आपल्या परिवारास उत्तम आरोग्य लाभो,सर्वांच्या मनोकामना पूर्ण होवोत, सर्वांना सुख, समाधान, धैर्य,आणि भरभराट लाभो, याचं माझ्या कडून व माझ्या परिवाराकडून शुभेच्छा.व हीच आई तुळजाभवनी मातेच्या चरणी प्रार्थना..अशा प्रांजळ शुभेच्छा देऊन खासदार जाधव यांनी महायुतीच्या सर्व घटक पक्षांनी एकत्रितपने व एकदिलाने मा. पंतप्रधान यांच्या विकसित भारताच्या स्वप्नपूर्तिकरता मा. नरेंद्रजी मोदी यांचे हात बळकट करावेत व महायुतीच्या उमेदवाराला अगोदर पेक्षाही अधिक मतांनी निवडून आणावे अशी प्रेमळ साद घातली. देऊळगाव येथील महायुतीच्या उदघाटन समारंभाच्या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस चे आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे,भाजपा जिल्हाध्यक्ष श्री गणेश मान्टे, शिवसेनेचे माजी आमदार श्री शशिकांत खेडेकर,श्री विनोद वाघ, श्री सुनील कायंदे,श्री गौतम कासारे, श्री शरद खरात तसेंच श्रीमती पुजाताई खान्देभराड उपस्थित होते तसेंच चिखली येथील कार्यक्रमामधे खासदार प्रतापराव जाधव व आमदार सौ. श्वेताताई महाले यांनी संपूर्ण देश मोदीजींच्या सोबत उभा असून जिल्ह्याच्या शिरपेचामध्ये अनेक मानाचे तुरे रोवण्यासाठी पुन्हा एकदा मा. प्रतापराव यांना अधिक मोठ्या संख्येने निवडून आणायचेच आहे व त्याकरिता घराघरात जाऊन अधिकाधिक संख्येने मतदारापर्यंत पोहचून जास्तीत जास्त मतदार मतदान करतील यासाठी महायुतीतील सर्व घटक पक्ष कार्य करतील याची निश्चिती असल्याचे सांगितले. या प्रसंगी श्री पंडितराव देशमुख,श्री सुनील पोफळे तसेच प्रा. मोरे, कैलास भालेकर, विलास घोलप व अन्य महायुती सदस्य उपस्थित होते. बुलढाणा येथील कार्यक्रमामध्ये मा. खासदार यांचेसोबत बुलढाणा विधानसभा मतदार संघाचे आमदार संजूभाऊ गायकवाड यांनी महायुतीतील सर्व सदस्यांना हिंदुत्ववादी विचारांची राखण करणाऱ्या मा.मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे हे निर्माण करीत असलेल्या बाळासाहेबांच्या विचाराचा बुलढाणा तयार करण्याकरिता बाळासाहेबांच्या सच्च्या शिलेदाराला खासदार प्रतापराव जाधव यांना सर्वात जास्त लीड बुलढाणा विधानसभा मतदार संघातून मिळवून देणार असल्याची ग्वाही दिली व त्यासाठी आपण स्वतः सर्व मतदार संघ पिंजून काढणार असल्याचे सांगितले, बुलढाणा येथील कार्यक्रमामध्ये मा. आमदार संजय गायकवाड यांचेसोबत समस्त शिवसेना,भाजप,राष्ट्रवादी काँग्रेस,आर पी आय,पी री पा. कवाडे गट,रयत क्रांती संघटना व इतर मित्र पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते हजर होते.

# संदिप शेळकेंनी उभारली परिवर्तनाची गुढी म्हणाले, ४ जूनला विजयाची गुढी उभारू...

**जनसंचलन/बुलढाणा**

वन बुलडाणा मिशनचे संकल्पक तथा बुलडाणा लोकसभा मतदारसंघासाठी अपक्ष उमेदवार संदीप शेळके यांनी आगळ्या वेगळ्या पद्धतीने मराठी नववर्षाचे स्वागत करून गुढी उभारली. बुलडाणा शहरातील निवासस्थानी त्यांनी परिवर्तनाची गुढी उभारली. यावेळी उभारण्यात आलेल्या गुढीवर जिल्ह्याच्या विकासासाठी आवश्यक घटकांचे विविध फलक लावण्यात आले, संदीप शेळकेंनी उभारलेली ही गुढी लक्षवेधी ठरली. प्रत्येक तालुक्यात एमआयडीसी झाली पाहिजे. पोलीस भरती आणि सैनिक भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गावोगावी रनिंग ट्रॅक झाला पाहिजे, सोयाबीन कापसाला उत्पादन खर्चापेक्षा दीडपट अधिक भाव मिळाला पाहिजे, जिल्ह्यात सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल झाले पाहिजे, जिल्ह्याला विशेष दर्जा मिळाला पाहिजे, बुलडाण्यात स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्र झाले पाहिजे यासह विविध फलक गुढीवर लावले होते.त्यामुळे गुढी अधिकच आकर्षक दिसत होती. ही परिवर्तनाची गुढी आहे, ही विजयाची गुढी आहे. जिल्ह्याच्या विकासाचे व्हिजन घेऊन मी निवडणुकीच्या रिंगणात उतरलो आहोत. जिल्ह्याचा सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठीची आपली तळमळ आहे. त्यामुळे बुलडाणा जिल्ह्यातील जनता आपल्याला १०० टक्के साथ देईल, ४ जूनला आम्ही विजयाची गुढी उभारू असे संदीप शेळके यावेळी माध्यमांशी बोलतांना म्हणाले.



दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# उमेदवारांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील




**जनसंचलन/सिंदखेडराजा**

उमेदवारांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे -जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील बुलडाणा, दि. ०८ : येत्या लोकसभा निवडणुकीतील उमेदवारांना चिन्हांचे वाटप करण्यात आले आहे. यानंतर प्रचार सुरू होणार असून या प्रचारामध्ये सर्व उमेदवारांनी निवडणूक आयोगाच्या निर्देशाचे पालन करीत आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉक्टर किरण पाटील यांनी केले. सोमवारी नामांकनपत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवसानंतर निवडणुकीसाठी कायम राहिलेल्या २१ उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात आले. यावेळी सामान्य निवडणूक निरीक्षक पी. जे. भागदेव, कायदा व सुव्यवस्थेचे निरीक्षक सेंथिल कृष्णा, खर्चविषयक निरीक्षक अमित शर्मा, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोणेवार, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपविभागीय अधिकारी शरद पाटील आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले उमेदवारांच्या नामांकनापासून खर्चाची तपशील घेण्यास सुरुवात झाली आहे. उमेदवारांनी निवडणूक खर्चासाठी स्वतंत्र बँक खाते उघडून त्यातूनच व्यवहार करावा. दहा हजारावरील रक्कम देताना धनादेशाचा उपयोग करण्यात यावा. खर्चाच्या नोंदी नियमित घेऊन खर्च निरीक्षक तीन टप्प्यात त्याचा आढावा घेणार आहे, यावेळी खर्च सादर करण्यात यावा. तसेच निवडणुकीनंतर तीस दिवसाच्या आत खर्चाचे पूर्ण विवरण सादर करण्यात यावे. उमेदवारांनी प्रचार साहित्य प्रकाशित करताना प्रकाशकाचे नाव, मुद्रकाचे नाव छापण्यात यावे, अन्यथा अशाप्रसंगी गुन्हाही नोंद करण्यात येतो. वाद, द्वेषमूलक आणि कुणाचीही बदनामी होणार नाही, यासाठी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे. वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देण्यासाठी पूर्वपरवानगीची गरज नाही. मात्र निवडणुकीच्या शेवटच्या ४८ तासांमध्ये जाहिराती द्यावयाच्या असल्यास त्या माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीकडून प्रमाणित करून घ्याव्यात. निवडणूक प्रक्रिया शांतता, भयमुक्त आणि निर्भयपणे होण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहे. सी-व्हिजील, इ-केवायसी, १९५० हेल्पलाइन, निवडणूक निरीक्षकांचे क्रमांक जाहीर करण्यात आले आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत होण्यासाठी आयोगाच्या निर्देशाचे पालन करण्यात येत आहे. तसेच ईव्हीएमच्या सुरक्षिततेसाठी स्ट्राँगरूममध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहे. बुलढाणा लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा मतदारसंघातील १७ लाख ८२ हजार ७०० मतदार असून १९६२ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. तसेच यात ५६ आदर्श मतदान केंद्र राहणार आहे. तसेच १ हजार १३९ मतदान केंद्रावर वेबकास्टिंग करण्यात येणार आहे. दिव्यांगांना सक्षम ॲपवर नोंदणी करून मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा प्राप्त करून घेता येणार आहे. दिव्यांग आणि ८५ वर्षावरील जेष्ठ नागरिकांना घरून मतदान करण्याची सुविधा देण्यात आली आहे. यासाठी मतदान केंद्र अधिकारी यांच्याकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी केलेल्या मतदारांच्या घरी जाऊन २१ ते २३ एप्रिल दरम्यान बॅलेट पेपरवर मतदान घेण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेचे चित्रीकरण करण्यात येणार आहे. जिल्ह्यात ४ हजार ३९५ सर्विस वोटर आहेत. त्यांची ही सुविधा करण्यात आली आहे. प्रशास-नातर्फे निवडणुकीची तयारी पूर्ण करण्यात आली असून मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. यावर्षी ७० टक्क्याहून अधिक मतदान होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले.

# म.फुले- डॉ.आंबेडकर जयंती उत्सवा निमित्त भव्य मॅरेथॉन स्पर्धा

## भीमगीतांचा प्रबोधनात्मक कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे- अतिशभाई खराटे





**जनसंचलन/मलकापूर**

महात्मा फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवानिमित्त भारतीय बौद्ध महासभा व डॉ. आंबेडकर सेवा ट्रस्ट, मलकापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ११ एप्रिल ते १४ एप्रिल २०२४ पर्यंत सांस्कृतिक, शैक्षणिक, मैदानी खेळ व समाज प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे यामध्ये प्रामुख्याने दिनांक ११ एप्रिल गुरुवार रोजी सकाळी ८ वाजता क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम व मी धावतो लोकशाहीसाठी भव्य मॅरेथॉन स्पर्धा विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आली असून ही स्पर्धा मलकापूर रेल्वे स्टेशन जवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक ते वाकोडी फाटा मलकापूर पर्यंत होणार आहे व या स्पर्धेत मुलाचा गट प्रथम बक्षीस रोख ५ हजार रुपये, द्वितीय रोख ३ हजार रुपये, तसेच मुलींचा गट प्रथम बक्षीस रोख ५ हजार रुपये, द्वितीय रोख ३ हजार रुपये देण्यात येणार आहेत तथा सर्वांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येतील तसेच दिनांक १४ एप्रिल रोजी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सकाळी १० वाजता मलकापूर रेल्वे स्टेशन जवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन व समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदना देण्यात येईल, तसेच सायंकाळी ६ वाजता जनता कॉलेज ग्राउंड मलकापूर येथे भव्य स्टेज व आकर्षक एलईडीच्या प्रकाश झोतात इंडियन आयडल फेम महाराष्ट्रातील प्रख्यात गायिका श्वे-ता दांडेकर व महाराष्ट्राचे प्रख्यात गायक सुनील तायडे, मुंबई यांचा भीम गीतांचा प्रबोधनात्मक बहारदार कार्यक्रम व जाहीर सभा अजयभाऊ सावळे, सुशीलभाऊ मोरे, राजुभाऊ शेगोकार, प्रताप बिऱ्हाडे, भीमराव नितोने यांच्या प्रमुख नियोजनात आयोजित करण्यात आली आहे तरी मलकापूर येथे वरील प्रकारे भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन केले असून नागरिकांनी या कार्यक्रमात हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याचे साक्षीदार व्हावे असे आवाहन अतिशभाई खराटे अध्यक्ष, म. फुले-डॉ.आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव मलकापूर यांनी केले आहे

# ११ एप्रिल पासून महामानवांच्या जयंतीत्सोवाला सुरूवात...

**जनसंचलन/बुलढाणा**

राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा ११ एप्रिल ते १४ एप्रिल पर्यंत भरगच्च विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार ११ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे गुरू महात्मा जोतीरावा फुले यांची जयंती साजरी होते. या दिवसापासून खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीला प्रारंभ होतो. त्यानिमित्ताने सायं. ६ वाजता गांधी भवनाच्या भव्य प्रांगणामध्ये प्रसिद्ध गायक इंडियन आयडल फेम संतोष जोंधळे यांच्या गीतांचा भव्यदिव्य कार्यक्रम होणार आहे. शुक्रवार १२ एप्रिल रोजी संपूर्ण महाराष्ट्राला आपल्या व्याख्यानाच्या खास शैलीने परिचित असलेले स्पर्धा परिक्षा मार्गदर्शक प्रा. विठ्ठल कांगणे सर यांच्या जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. युवकांचे आडॉल असलेल्या कांगणे सरांच्या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. तर शनिवार १३ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता भव्य मोटार सायकल रैलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीचा प्रारंभ गांधी भवन जयस्तंभ चौक येथून होवून शहराच्या मुख्य रस्त्याने रॅली मार्गक्रमन करीत या रॅलीचा मलकापूर रोडवरील धम्मगिरी बुध्दविहार येथे समारोप होणार आहे. शनिवार १३ एप्रिल रोजी सायं.६ वाजता प्रसिध्द बॉलीवुड सिंगर राहूल साठे यांचा बुध्द-भीम गितांचा कार्यक्रम गांधी भवन जयस्तंभ चौक येथे होणार आहे. तर रात्री १२ वाजता फटाक्यांच्या आतिषबाजीत भिमजन्मोत्सव जयस्तंभ चौकात साजरा करण्यात येणार आहे. रविवार १४ एप्रिल २०२४ रोजी विश्वरत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीच्या निमित्ताने सकाळी ८ वाजता भीम पाळणा व समता सैनिक दल व माजी सैनिकांच्या वतिने मानवंदना देण्यात येईल.यावेळी २०० किलो मोतीचूर लाडूचे वाटप करण्यात येणार आहे. सकाळी १० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा विजय नगर येथून महीलांची मोटार सायकल रॅली काढण्यात येणार असून दुपारी ३ वाजता भव्य मिरवणूकेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर मिरवणूकीत बुलढाणा शहर व परिसरातील जयंतीत्सोव मंडळाचे देखावे व रथ सहभागी होणार आहे. सोमवार १५ एप्रिल रोजी सकाळी उत्सव समिती व बुलढाणा नगर परीषदेच्या सयुक्त विद्यमाने स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. तरी या सर्व कार्यक्रमास धम्म बांधवांसह शहरातील बहुजन बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन बुलडाणा शहर उत्सव समितीचे अध्यक्ष राहुल कासारे,कार्याध्यक्ष प्रशांत जाधव,सचिव विनोद इंगळे, कोषाध्यक्ष निलेश राऊत व सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

## कर्मचाऱ्यांचे गैरवर्तन खपवून घेतले जाणार नाही-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील



जनसंचलन/बुलढाणा

रेतीमाफीयांशी संगनमत करून शासकीय पथकातील कर्मचाऱ्यांना धमकी देणारा शासकीय वाहन चालक संतोष भिवसन सातभाकरे याला निलंबित करण्यात आले आहे. शासकीय कामकाजात अडचण आणणाऱ्या कर्मचाऱ्यांचे गैरवर्तन खपवून घेतले जाणार नाही, असा इशारा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिला आहे. शेगाव तालुक्यातील पूर्णा नदीपत्रातून रेतीचे अवैध उत्खनन आणि वाहतूक रोखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी स्थापन केलेल्या पथकातील पाच शासकीय कर्मचाऱ्यांना दि. १८ मार्च रोजी रात्री नऊ वाजताचे दरम्यान वाहन चालक श्री. सातभाकरे यानी धमकी दिली होती. शासकीय पथक जलंब-माटरगाव रस्त्याने जात असताना वाहन चालक श्री. सातभाकरे हा खाजगी वाहनातून येऊन पथकाच्या वाहनासमोर त्यांनी आपले खाजगी वाहन उभे केले. तसेच कर्मचारी संतोष रामदास भेंडे यांच्यासोबत वाद घातला. पुन्हा या रस्त्याने आल्यास याद राखा, अशी धमकी दिली. त्याचवेळी या ठिकाणी सात ते आठ चारचाकी वाहने आली. यातील जणानी श्री. सातभाकरे याच्या सांगण्यावरून पथकातील कर्मचाऱ्यांसोबत वाद घातला. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये दहशत पसरली. याबाबत त्यांनी तातडीने वरिष्ठांना माहिती दिली. याबाबतच्या अहवालानुसार तहसीलदार दीपक बाजाड यांनी जिल्हाधिकाऱ्यांना अहवाल सादर केला. त्यानुसार जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी वाहनचालक श्री. सातभाकरे याला दि. २६ मार्च रोजी निलंबित केले आहे. शासकीय सेवेत असताना शासकीय वाहन चालक श्री. सातभाकरे यांचे वर्तन अयोग्य आहे. रेतीचे अवैध उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्या माफीयांना अभय देण्यासाठी श्री. सातभाकरे यांची महत्वाची भूमिका असल्याचे उघड झाले. तसेच रेतीमाफियांसह कर्मचाऱ्यांना धमकी देण्याचा प्रकार घडला असल्याने जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी तातडीने कारवाई करून श्री. सातभाकरे याला निलंबित केले आहे. कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यांचे असे वर्तन खपवून घेतले जाणार नाही. असा कोणताही प्रकार घडत असल्यास तातडीने निदर्शनास आणावा. याबाबत योग्य ती चौकशी करून संबंधित कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात येईल, असेही जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी सांगितले.

## लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ उमेदवाराच्या खर्चाच्या नोंदी तीन वेळा तपासणार...

### खर्च नोंदी तपासणीचे वेळापत्रक जाहिर...

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने उमेदवारांची खर्च नोंदवही तपासणीसाठी वेळापत्रक जाहिर करण्यात आले आहे. खर्च तपासणीसाठी निवडणूक खर्च निरीक्षक अमित शर्मा हे जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उपस्थितीत उमेदवारांचे खर्च तपासण्यात येतील. उमेदवाराचे खर्च १२, १८ आणि २४ एप्रिल रोजी तपासण्यात येणार आहे. सदर वेळापत्रकानुसार सर्व उमेदवारांनी आपल्या खर्चाचे लेखे आवश्यक त्या सर्व अभिलेख्यासह तपासणीसाठी स्वत: किंवा प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत उपलब्ध करावे. सदर तपासणी निवडणुक आयोगाच्या निर्देशानुसार अनिवार्य असल्याने सर्व उमेदवार किंवा प्राधिकृत प्रतिनिधीने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.




वेळापत्रक याप्रमाणे : पहिली तपासणी दि. १२ एप्रिल २०२४, दुसरी तपासणी दि. १८ एप्रिल, तर तिसरी तपासणी दि. २४ एप्रिल रोजी होईल. तपासणीचा वेळ ही सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहणार असून सदर तपासणी नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा येथे होईल. वरील नमुद रोजी सर्व उमेदवारांच्या लेख्यांची तपासणी करण्यात येणार आहे. उमेदवारांनी त्यांचे लेखे सविस्तर भरावे. निवडणुकीच्या विविध टीमच्या माध्यमातून खर्च घेण्यात येणार आहे. त्यामुळे यात त्रुटी राहू नये, तसेच खर्च निवडणुकीच्या बँक खात्यातून धनादेशाने देण्याची काळजी घ्यावी, असे आवाहन निवडणूक खर्च निरीक्षक अमित शर्मा यांनी केले आहे. खर्च लेखे तपासणीसाठी आवश्यक कागदपत्रांसह वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन खर्च नियंत्रण समितीचे नोडल अधिकारी तथा मुख्य लेखा वित्त अधिकारी प्रकाश राठोड यांनी केले आहे.

## मोबाईल चोरीचा प्रयत्न करुन पळतांना अज्ञात चोरट्याने केला हवेत गोळीबार...



जनसंचलन/मलकापूर

रेल्वे स्थानकावर मोबाईल चोरीचा प्रयत्नात असलेल्या तीन चोरट्यांचा प्रयत्न फसल्यानंतर व नागरिकांकडून त्यांना पकडण्याचा प्रयत्न झाला असता त्या चोरट्यांनी पळ काढला. यावेळी नागरीक मागे येत असल्याचे पाहून तिघांपैकी एका चोरट्याने आपल्या जवळील पिस्तुलामधून हवेत गोळीबार केल्याची घटना आज ७ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजे दरम्यान घडल्याची माहिती शहर पोलिस निरीक्षक अनिल गोपाळ यांनी दिली. शहर पोलिस निरीक्षक अनिल गोपाळ यांनी सांगितले की, मलकापूर रेल्वे स्थानकावरील फलाट क्र. १ वर गंगानगर एक्स्प्रेस थांबली असता आधीपासूनच बसून असलेल्या त्या तिघांनी एका प्रवाशाचा मोबाईल हिसकण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार तेथे असलेल्या प्रवाशांच्या लक्षात येताच त्यांनी आरडाओरड करीत त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्या तिघांनी तेथून पळ काढूत रेल्वेच्या भिंतीवरून उड्या मारून रामवाडी परिसरातून पळत सुटले. यावेळी काही नागरीक त्यांचा पाठलाग करत धावत निघाले. नागरिक आपल्याला पकडतात की काय या भीतीपोटी त्या तिघांपैकी एकाने त्याच्या जवळील पिस्तूलमधून हवेत गोळीबार केला व धावत जात नांदुरा रोडवरील ऑटो रिक्षामध्ये बसून ते तिघेही पसार झाले. सदर घडलेल्या प्रकारानंतर शहर पो. स्टे. चे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. या प्रकरणाचा तपास शहर पोलीस निरीक्षक अनिल गोपाळ यांचे मार्गदर्शनात पोलीस करीत आहेत.

## तलवार फिरविणाऱ्या व चोरी करणाऱ्या दोघांना अटक...

जनसंचलन/मेरा बु

बसस्टॉपवर एक तरुणाने तलवार फिरवून नागरिकांमध्ये दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला होता तसेच दुसऱ्या एका तरुणाने लाखों रुपयाचे सोलर प्लेट वा मोटार पंप चोरून विकल्या होत्या या दोन्ही प्रकरणात अंढेरा ठाणेदार यांनी मोठी धाडशी कार्यवाही करीत एक तलवार तर २२ सोलर प्लेट आणि एक मोटार ताब्यात घेवून आरोपीवर ८ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करून अटक केली आहे. स्थानिक बसस्टॉपवर प्रदीप पंढरीनाथ सानप वय २८ हा अवैधरित्या घातक शस्त्र जवळ बाळगुन खुलेआम लोकांच्या मनात भिती निर्माण होईल अशा पध्दतीने फिरत आहे. त्यामुळे तात्काळ घटनास्थळी पी एस आय गजानन वाघ च पोहेकॉ रामेश्वर आंधळे लगेच धाव घेवून आरोपीला रंगेहाथ पकडले आणि त्याच्या जवळून शस्त्र लोखंडी तलवार जप्त केली आणि पो. कॉ. भागवत गणेश गिरी, यांच्या तक्रारी वरुन आरोपी प्रदीप ऊर्फ बाळु पंढरीनाथ सानप वय २८ वर्ष रा. अंढेरा याचे विरुध्द शरख अधिनियम कलम ४. २५ प्रमाणे गुन्हा केला आहे. त्याच बरोबर झोटिंगा ह मु शिवणी




येथील आरोपी संदीप डीघोळे वय २८ वर्ष या तरुणाने गेल्या अनेक वर्षांपासून चोऱ्या करण्याचा व्यवसाय सुरू केला होता. त्यामध्ये शेतकऱ्यांच्या शेतातील स्प्रिंग्लर, विद्युत मोटार, सोयाबीन पोते, आदी लहान मोठ्या चोऱ्या करीत होता अनेक वेळा त्याला चोरी प्रकरणात अटकही केली. तसेच लोकांनी चोऱ्या करतांना त्यास रंगेहाथ पकडले मात्र तो काही दिवस पोलीस कोठडीत राहून बाहेर येताच पुन्हा चोऱ्या करण्याचा व्यवसाय करतो. त्याचे चोऱ्या करण्याचे मनोबल वाढल्याने त्याने चक्क शेतकऱ्यांच्या शेतातील २२ सोलर प्लेट चोरून बाहेर विकल्या तसेच काही विहिरीतील विद्युत मोटार पंपही चोरून विकले. या घटनेची गुपीत माहिती ठाणेदार विकास पाटील यांना लागताच लगेच आरोपीला घटनास्थळी जावून ताब्यांत घेतले आणि त्याची कसून चौकशी केली असता त्याने सोलर प्लेट व मोटार पंप कोणाला विकले याची कबुली दिली त्यामुळे पोलिसांनी आरोपीला घेवून संपूर्ण विकलेला माल जप्त केला. या प्रकारामुळे अंढेरां पोलीस स्टेशन मध्ये दाखल झालेल्या ४ गुन्ह्यातील संपूर्ण माल जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. त्यामुळे ठाणेदार विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार गजानन वाघ, पोहेकॉ रामेश्वर आंधळे यांनी आरोपी संदिप डीघोळे रा शिवणी याच्याविरुध्द कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# वाघ इतक्या लवकर गवत खायला सुरुवात करेल असं वाटलं नव्हतं, विजय वडेट्टीवारांची सडकून टीका...

**वृत्तसंस्था/मुंबई**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज शिवाजी पार्कवर गुढीपाडव्याच्या मेळाव्यात लोकसभा निवडणुकीत महायुतीला पाठिंबा जाहीर केला. हा पाठिंबा बिनशर्त आणि फक्त नरेंद्र मोदींनाच असल्याचे राज ठाकरे यांनी सांगितले. त्यानंतर त्यांनी राज्यातील सर्व मनसे सैनिकांना विधानसभेच्या तयारीला लागण्याचे आदेश दिले आहेत. आता यावरुन राजकारणात चर्चांना उधाण आले आहे. विरोधकांनी राज ठाकरेंवर टीका करण्यास सुरूवात केली आहे. याबाबत विजय वडेट्टीवारांनी प्रतिक्रिया दिली आहे. या प्रतिक्रियेत वडेट्टीवारांनी राज ठाकरेंना शेळीची उपमा दिली आहे. सभेआधी वडेट्टीवारांनी राज ठाकरेंना वाघाचा कोल्हा झाल्याचे म्हटलं होतं.नवनिर्माण सेना भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी या महायुतीला बिनशर्त पाठिंबा देत असल्याचे राज ठाकरे म्हणाले. आम्हाला राज्यसभा नको आहे. बाकीचे संभाषण आम्हाला नको आहे. हा पाठिंबा फक्त नरेंद्र मोदींना आहे. माझी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सर्व सहकाऱ्यांना विनंती आहे. चांगली संस्था तयार करा. मतदारसंघ तयार करा. तुम्ही विधानसभेची तयारी सुरू करा, असं विधान राज ठाकरेंनी गुढीपाडव्याच्या मेळाव्यात केले आहे.यावर आता विजय वडेट्टीवारांनी राज ठाकरे यांचा चांगलाच समाचार घेतला आहे. वडेट्टीवार म्हणाले, राज ठाकरे दिल्ली दरबारी गेले तेव्हाच ते भाजपसोबत जाणार हे मराठी जनतेला कळले होतं. पण वाघ इतक्या लवकर गवत खायला सुरुवात करेल, असं वाटलं नव्हतं. दिल्लीत जाऊन वाघाची शेळी झाली. राज ठाकरेंसारख्या लढवय्या नेत्याने गुलामगिरीचे जोखडं गळ्यात घातले का? असा सवाल उपस्थित करत राज ठाकरेंवर विजय वडेट्टीवारांनी सडकून टीका केली आहे.मात्र आता राज ठाकरे महायुतीत गेल्याने महाविकास आघाडीच्या मतांवर काही परिणाम होणार नाही. २०१९ मध्ये त्यांनी मोदी यांच्या विरोधात भूमिका घेतली होती. मात्र आता राज ठाकरेंनी नरेंद्र मोदींनाच पाठिंबा दिला. म्हणजेच दाल में कुच तो काला है. कदाचित भाजपने



राज ठाकरेंची एखादी नस दाबली असावी, यामुळे त्यांनी हा निर्णय घेतला, असं म्हणत विजय वडेट्टीवारांनी त्यांना धारेवर धरलं आहे. राज ठाकरे आधी थोडेसे झुकले होते, आता कमरेतून झुकले. मात्र आता हे महाराष्ट्रातील जनतेला मान्य होणार नाही, असं वक्तव्य विजय वडेट्टीवारांनी केलं आहे.

## पोलिस स्टेशन रायपूर तर्फे इफ्तार पार्टीचे आयोजन

### ठाणेदार दुर्गेश राजपूत यांनी दिले सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे संदेश



**जनसंचलन/ रायपूर**

दिनांक ०९/४/२०२४ रोज मंगळवार पवित्र महिना रमजान निमित्ताने रायपूर पोलिस स्टेशन च्या वतीने मुस्लिम बांधवांसाठी रोजा इफ्तार पार्टीचे मंगळवारी सायंकाळी आयोजन करण्यात आले होते. या वेळी रायपूर सैलानी पिंपळगाव सराई येथील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सध्या मुस्लिम समाज बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरू असून एकात्मता, भाईचारा या भूमिकेतून रायपूर पोलिस ठाण्याच्या वतीने मंगळवार ला रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. पोलिस अधिक्षक श्री सुनील कडासने व उप विभागीय पोलीस अधिकारीश्री सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रायपूर पोलिस ठाण्याच्या वतीने मुस्लिम बांधवांसाठी रोजा इफ्तार हा कार्यक्रम सायंकाळी पोलीस स्टेशन च्या प्रांगणात आयोजित केला होता. रायपूर पोलिस स्टेशन चे ठाणेदार दुर्गेश राजपूत आणि सर्व पोलीस कर्मचारी यांनी हा कार्यक्रम यशस्वी होण्या साठी मेहनत घेतली आहे. यावेळी रायपूर येथील शांतता समिती सद्स्य फारुक सेठ सौदागर , श्रीकिसन बाहेती, डॉक्टर प्रकाश खंडागळे, राजू शेख , जाबिर खान, सामाजिक कार्यकर्ते , चांद मुजावर , अकील हाजी साहेब साबीर मुजावर अकील कुरैशी रईस शेख, सादिक शाह, झाहेद शेख नुमान खान सल्लू भाई सादिक कुरेशी मो एजाज किशोर शिरसाट, शेख भिकन आसीफ शाह जावेद शाह बलाप्रंसाद जैस्वाल हारून मुझावर जग्गू चौथे राहुल देशमाने शाम झागरे आसीफ सौदागर ग्र स व पोलिस ठाण्याचे सर्व पोलीस कर्मचारी राहुल जाधव आदीची उपस्थिती होती

## गुढीपाडव्याच्या सणाला राशेनचा माल मिळालाच नाही नियोजन शुन्य पुरवठा विभागाचा प्रताप

**जनसंचलन/ चिखली**

तालुक्यातील मौजे मेरा खुर्द येथे शासनाचे दोन दुकाने आहे परंतु कोणत्याही दुकानदाराने आज रोजी राशेनचा माल वितरित केला नाही या गुडी पाडवा हिंदुच्या सणाला सणासुदीला सुद्धा रोशनचा माल वाटप केला नाही मेरा खुर्द येथे चार ते पाच दिवसांपूर्वी पुरवठा विभागाने मला पाठवला परंतु डाटा एन्ट्री झाली नसल्यामुळे सदर मला दुकानदारांनी वाटप केला नाही परंतु काल ०८/०४/२०२४ च्या दिवसी पुरवठा विभागाने डाटा एन्ट्री करून सदर दुकानदारांना मालवितरित करण्याचे माहिती दिली होती आज पूर्ण जग हे डिजिटल होत असताना रेशन दुकान सुद्धा डिजिटल झाले आहे परंतु वितरकांच्या नियोजन चिन्हे कारभारामुळे दुकानदार यांनी तालुका पुरवठा अधिकारी यांचा मेसेज पाहलाच नाही त्यामुळे आईन सणसुद्धा राशनच्या मालाचे वाटप मेरा खुर्द आणि परिसरामध्ये झालेच नाही काही दुकानदारांनी तर मेसेजच पाहिला नाही असे सुद्धा




प्रतिक्रिया दिली आहे मेरा खुर्द मध्ये सर्व समाजाचे लोक गुन्हे गोविंदाने राहत आहे या गावांमध्ये मुस्लिम समाज मागासवर्गीय समाज माळी मराठा समाज व इतर समाज हे गुन्या गोविंदाने राहत आहे या समाजाचे हिंदू समाजाचा गुढीपाडवा डॉक्टर बाबासाहेब महात्मा ज्योतिराव फुले जयंती तसेच मुस्लिम ईद हा महत्त्वाचे सण याच दिवसांमध्ये होऊ घातले आहेत त्यांचे सुद्धा गोडधोड व्हावे म्हणून शासनाने ०४/०८/२०२४ लाच डाटा एन्ट्री करून दिली परंतु वितरकांच्या नियोजन शून्य कारभारामुळे लाभार्थ्यांना माल मिळालाच नाही तालुका पुरवठा अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता मागील तीन महिन्याचे साखर बाकी आहे त्यामुळे माल वितरित केला नाही असे असमाधान कारक उत्तर दिले नाही तीन महिन्याचा माल ऑनलाईनच्या जमान्यामध्ये कसा बाकी राहिला हे सुद्धा चर्चेचा विषय होऊ शकतो आणि सणासुदीला पुरवठा विभागाच्या नियोजन शून्य कारभारामुळे लाभार्थ्यांना माल मिळू शकला नाही हे या ठिकाणी विशेष आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958